# Mobile App developed by ABM benefiting another ULB of Maharashtra
## 17th May 2017

Murgud ULB (Kolhapur Distt.) will be soon benefited through 'eMunicipality' Mobile App which has been developed by ABM. This has been informed by Municipal President Rajekhan Jamadar today i.e.17 May 2017 as well as the information about Mobile App and its features were informed by ABM.

A) SAKAL NEWS:

# मुरगूड नगरपरिषद देणार मोबाईल अॅपद्वारे सेवा

## नगराध्यक्ष जमादार : राज्यातील पहिली क वर्ग नगरपरिषद, लवकरच होणार उपक्रम

मुरगूड, ता. १६ : मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी व जन्म - मृत्यू प्रमाणपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नगरपालिकेत एखादी तक्रार द्यावयाची असल्यास किंवा दिलेल्या तक्रारीचे काय झाले याचा शोध घेण्यासाठी तसेच यासारख्या विविध कामासाठी आता मुरगूड नगरपरिषदेने मोबाईल अॅप नागरिकांसाठी उपलब्ध करून दिले आहे. लवकरच याचे उद्घाटन होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत नगराध्यक्ष राजेखान जमादार यांनी दिली.

गुगल प्ले स्टोअर वरून eMunicipality हे मोबाईल अॅप नागरिकांना मोफत घेता येणार आहेत. शिवाय जगभरातून कोठून ही आपला मालमत्ता कर भरणा करता येणार आहे. जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र,कामाचा शोध या अॅपवरून घेता येणार आहे. नगरपरिषदेच्या तक्रार निवारण प्रणालीद्वारे तक्रार नोंदविणे सहज सोपे होणार आहे. यामध्ये सार्वजनिक



स्वच्छता, रस्ते, विद्युत, बांधकाम, जन्म-मृत्यू नोंद या संदर्भातील तक्रारी यावर घरबसल्या करता येणार आहेत. एवढेच नव्हे तर केलेल्या तक्रारीचे पुढे काय झाले? त्याची सद्य:स्थिती काय आहे हे देखील पाहता येणार आहे.

केवळ हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच राज्यातील अ आणि ब वर्ग नगरपालिकांनी असे अॅप उपलब्ध करून दिले आहे. पण क वर्ग नगरपालिकेत मात्र मुरगूड नगरपालिका राज्यात एकमेव आहे. हे मोबाइल अॅप कसे वापरावे व ते कसे उपलब्ध करता येईल? याची माहिती ए. बी. एम. प्रतिनिधी संग्राम पाटील यांनी प्रात्यक्षिकाद्वारे उपस्थितांना दिली.

उपनगराध्यक्ष जयसिंग भोसले, नगरसेवक एस. व्ही. चौगले उपस्थित होते.

**असे मिळावा अॅप :**

गुगल प्ले स्टोअर मध्ये जाऊन eMunicipality नावाने सर्च करून आपल्या मोबाईल वर डाऊन लोड करून घ्या.अॅप इन्स्टॉलेशनसाठी वापरकर्त्याचे नाव व मोबाईल क्रमांकाचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी मोबाईलवरच रजिस्ट्रेशन फॉर्म भरा. रजिस्ट्रेशन झाल्यानंतर eMunicipality हे अॅप तुमच्या मोबाईलवर कार्यान्वित होईल.

B) PUDHARI NEWS:

पुढारी

# मुरगूड पालिकेचेही आता 'अॅप'



नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांची माहिती

## प्रमाणपत्र शोध, तक्रार निवारण, कर भरणा एका क्लिकवर



**मुदाळतिट्टा : प्रतिनिधी**

मुरगूड नगरपरिषद व ए.बी.एम. नालेजवर या कंपनीच्या वतीने मुरगूडवासीयांना वेगवेगळ्या प्रमाणपत्रांचा शोध घेण्याकरिता, केलेल्या तक्रारींचे काय झाले याची चौकशी करण्यासाठी, तसेच मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी नगरपरिषदेमार्फत मोबाईल अॅपद्वारे सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यातील १४९ 'क' वर्ग नगरपालिकांपैकी ही योजना राबवणारी मुरगूड नगरपालिका ही पहिली असल्याची माहिती नगराध्यक्ष राजेखान जमादार व उपनगराध्यक्ष जयसिंग भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ही सुविधा नगरपरिषदेकडील वेगवेगळी कामे सोपी करणार आहे. माहिती व तंत्रज्ञानाच्या वापरावर भर देऊन नागरिकांना सहज सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी मोबाईल अॅपच्या मदतीने कर भरणा करता येणार आहे. मुरगूडमध्ये एकूण २,९७४ मिळकतधारक आहेत. याचा फायदा या मिळकतधारकांना होणार आहे. याशिवाय जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, विवाह नोंद प्रमाणपत्र, कामाचा शोध या अॅपवरून करता येणार आहे. नगरपालिकेच्या तक्रार निवारण प्रणालीद्वारे तक्रार नोंदवणे यामध्ये सार्वजनिक स्वच्छता, रस्ते, विद्युत, बांधकाम, जन्म-मृत्यू अशा तक्रारी करता येणार आहेत. एवढेच नव्हे, तर केलेल्या तक्रारीचे काय झाले याची माहितीही या अॅपच्या माध्यमातून मिळणार आहे. यावेळी नगरसेवक शिवाजी चौगले, जीवन साळोखे, दत्तात्रय मंडलिक, संग्राम कांबळे आदी उपस्थित होते.

**...असे मिळवा अॅप**

गुगल प्ले स्टोअरमध्ये जाऊन emunicipality नावाने सर्च करून अँडॉईड अॅप मोबाईल फोनवर डाऊनलोड करून इन्स्टॉल करा. अॅप इन्स्टॉलेशनसाठी वापरकर्त्यांना नाव व मोबाईल फॉर्म भरता येईल. रजिस्ट्रेशन झाल्यानंतर हे अॅप मोबाईलवर कार्यरत होईल.

My Kolhapur
Page No. 8 May 18, 2017
Powered by: erelego.com

C) LOKMAT NEWS:

लोकमत

# मुरगूड नगरपालिकेकडून मोबाइल ॲप सुरु

## नागरिकांचा वेळ वाचणार : महाराष्ट्रामधील पहिली नगरपालिका

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुरगूड :** माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये उज्ज्वल कामगिरी करणाऱ्या मुरगूड नगरपालिकेने नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मोबाईल ॲप सुरु केले आहे. राज्यातील १४९ क वर्ग नगरपालिकांपैकी ही योजना राबवणारी मुरगूड नगरपालिका ही पहिली असून, नागरिकांना आता पालिकेशी संपर्क साधने सुलभ झाले आहे. लवकरच शानदार उद्घाटनाद्वारे हे ॲप नागरिकांसाठी उपलब्ध करून दिले जाणार आहे, अशी माहिती नगराध्यक्ष राजेखान जमादार व उपनगराध्यक्ष जयसिंग भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या ॲपबद्दल संग्राम कांबळे यांनी सविस्तर माहिती दिली. नगरपरिषद व ए.बी.एम. या कंपनीच्या वतीने मुरगूडवासीयांना वेगवेगळ्या प्रमाणपत्रांचा शोध घेण्याकरिता, केलेल्या तक्रारीचे काय झाले, याची चौकशी करण्यासाठी नगरपरिषदेमार्फत मोबाइल ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे. गूगल प्ले स्टोअरवरून मोफत उपलब्ध असणारे हे ॲप नागरिकांची नगरपरिषदेकडील वेगवेगळी कामे सोपी करणार आहे. माहिती व तंत्रज्ञानाच्या वापरावर भर देऊन नागरिकांना सहज सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी मोबाईल ॲपच्या मदतीने करभरणा करता येणार आहे. मुरगूडमध्ये एकूण २९७४ मिळकतधारक आहेत. याचा फायदा या मिळकतधारकांना होणार आहे.

याशिवाय जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, विवाह नोंद प्रमाणपत्र, आदी कामाचा शोध या ॲपवरून घेता येणार आहे. या ॲपद्वारे नगरपालिकेच्या विविध सुविधेबाबत नागरिकांना विनाविलंब तक्रार करता येणार आहे. शिवाय समस्येबाबतचे छायाचित्रे पाठविता येणार आहे. विविध विभागांसदर्भातील तक्रारीही यावर करता येणार आहेत. तक्रारीचे निरसन झाले किंवा नाही, याची माहिती मोबाईलवर मेसेजद्वारे नागरिकांना मिळणार आहे. पत्रकार परिषदेला माजी प्राचार्य जीवन साळोखे, नगरसेवक शिवाजी चौगले, सुनील चौगले, दत्तात्रय मंडलिक, रणजित निंबाळकर, जयवंत गोधडे आदी उपस्थित होते.

### असे मिळवा ॲप

गूगल प्ले स्टोअर मध्ये जाऊन eMunicipality नावाने सर्च करून सदरचे ॲप मोबाईल फोनवर डाऊनलोड करून इंस्टॉल करता येईल. ॲप इंस्टालेशनसाठी वापरकर्त्याचे नाव व इतर माहिती ऑनलाइन भरता येईल. रजिस्ट्रेशन झाल्यानंतर eMunicipality हे ॲप मोबाईलवर कार्यरत होईल. विनामोबदला सदरचे ॲप जगातील कोणत्याही ठिकाणावरुन नागरिकांना वापरता येणार आहे.




Hello Kolhapur
Page No. 7 May 18, 2017
Powered by: erelego.com

D) DAINIK MAHASATTA NEWS

# नागरीकांच्या सोयीसाठी मुरगुड पालिकेची मोबाईल ॲप निर्मिती

**मुरगूड ता.१६(प्रतिनिधी)–**

मुरगूड नगरपालिका नागरीकांसाठी शहरातील विविध तक्रारी करणे,जन्म मृत्यू,विवाह नोंदणीसह अन्य विविध दाखले मिळवणे,घरफाळा पाणी पट्टी भरणे, तक्रारीची चौकशी करणे आदि कामे घर बसल्या करण्यासाठी मोबाईल ॲपची निर्मिती केली असल्याची माहीती मुरगुड नगरपालिकेचे नगराध्यक्ष राजेखान जमादार, उपनगराध्यक्ष जयसिंग भोसले, ए. बी. एम. नॉलेजवअरचे संग्राम कांबळे यांनी आज पत्रकार परिषदेमध्ये दिली.हा उपक्रम राबवणारी मुरगूड नगरपालिका महाराष्ट्रातील १४९ क वर्ग नगरापालिकेतील पहिली ठरली आहे.या उपक्रमाने नगरपालिका आणखी हायटेक बनणार आहे. नागरीकांना जन्म,मृत्यू,विवाह नोंदणी सह अन्य दाखले,घरपट्टी पाणी भरणे, स्वच्छता,पाणीसह अन्य तक्रारी देण्यासाठी नगरपालिकेकडे जावे लागते.तेथे संबंधीत अधिकारी भेटले तर ठिक नाहीतर पुन्हा हेलपाटे मारावे लागतात या सर्व त्रासासून सुटका करण्यासाठी आणि विविध दाखले मिळवण्यासाठी व पाणीपट्टी, घरफाळा भरणेसाठी विविध तक्रारी करण्यासाठी नगरपालिकेकडे जाण्याची गरज भासणार नाही घरबसल्या आपल्या मोबाईलवर हा ॲप मोफत डाऊनलोड करुन या सर्व सेवा मिळवता येणार आहेत.या सेवा मिळण्यासाठी ठराविक कालावधी निश्चित केला असून निर्धारीत वेळेतच तक्रारीचे निवारण किंवा विविध दाखले मिळणार आहेत. आपली मागणी,तक्रार दाखल होताच व तिचे निवारण झाल्यावर संबधीत नागरीकांना तसा एस. एम. एस.देखील पाठवला जाणार आहे.यावेळी नगरसेवक शिवाजीराव चौगले,दत्ता मंडलिक, माजी प्राचार्य जीवन साळोखे,संजय चौगले हजर होते.